# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com

जा.क्र. /गोंविग/कुसका/ ३९१६ /२०२२ दि. २२/०४/२०२२

## परिपत्रक

**विषय:- नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपूरी येथे आयोजित राज्यस्तरीय निबंधलेखन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्याबाबत.**

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे सर्व विभाग प्रमुख, यांना कळविण्यात येते की, नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपूरी येथे एप्रिल, २०२२ या महिण्यामध्ये राज्यस्तरीय निबंधलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. करीता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सदर स्पर्धेमध्ये सहभाग घेण्याकरीता अवगत व प्रोत्साहित करण्यात यावे ही विनंती.

22/4/2022
(डॉ. अनिल चिताडे)
कुलसचिव (प्र.)

**सहपत्र :- कार्यक्रम पत्रिका**

## निबंधलेखनाचा विषय :

**ग्रामस्वराज्य आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरणामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचे योगदान**

## ❊ रोख पुरस्कार ❊



₹ 5,000/-

₹ 3,000/-

₹ 2,000/-

उत्तेजनार्थ पारितोषिक रु. १०००/- रोख रक्कम


उत्तेजनार्थ पारितोषिक रु. १०००/- रोख रक्कम

### सांस्कृतिक विभाग व समितीगण

| | | |
|---|---|---|
| प्रा. बालाजी दमकोंडवार | - | ९८२२४००५५३ |
| प्रा. डॉ. प्रकाश वट्टी | - | ९६०४३३५४६६ |
| डॉ. दर्शना उराडे | - | ९४२२१३७४१९ |
| डॉ. के. एम. शर्मा | - | ८२०८४६३६९९ |
| प्रा. जयेश हजारे | - | ९६०४७०३१३७ |
| श्री. विनय भागडकर | - | ९४०५१४७१३३ |

संयोजक
डॉ. पद्माकर डि. वानखडे
(सांस्कृतिक विभागप्रमुख)
संपर्क : ९९७५१९०५३९

डॉ. एन. एस. कोकोडे
प्राचार्य
नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय
ब्रम्हपुरी



बुक-पोस्ट

प्रति,

प्रेषक,
डॉ. एन. एस. कोकोडे
प्राचार्य
नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी
जि. चंद्रपूर - ४४१२०६, दुरध्वनी - ०७१७७ - २७२१२३
संकेत स्थळ - www.nhcb.in

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय

ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर - ४४१ २०६

द्वारा आयोजित



वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
प्रथम अध्यक्ष

निबंध ईमेल वर पाठविण्याचा कालावधी
२५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२२

## राज्यस्तरीय
# निबंधलेखन स्पर्धा
(सत्र २०२१-२०२२)

❊ आयोजक ❊

**नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी**

जि. चंद्रपूर

NAAC B++
(CGPA-2.87)

पूर्व विदर्भाच्या चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, नागपूर व गडचिरोली जिल्ह्याच्या सिमावर्ती पंचक्रोशीत, वैनगंगेच्या काठी शिक्षणाची गंगोत्री, ग्रामीण जनतेच्या दारी पोहचविण्याचे कार्य सन १९४१ पासून ने. हि. शिक्षण संस्थेने सुरु केले. ब्रम्हलीन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे संस्थेचे प्रथम अध्यक्ष असून त्यांची उत्कट प्रेरणा व मार्गदर्शन आणि कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांचे उदार दातृत्व व दिव्य संकल्पनेतून साकारलेले नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी हे सभोवतालच्या परिसरात कल्पवृक्ष ठरले आहे. "यावे ज्ञानासाठी, निघावे सेवेसाठी" हा संकल्प घेऊन आमच्या महाविद्यालयाने भारतमातेच्या सेवेसाठी अनेक कर्तबगार प्रशासकीय अधिकारी, नेतृत्व व व्यक्तिमत्व घडविले आहे.

आज शिक्षणाचा प्रत्येक महत्त्वाचा कळस पादाक्रांत करून ब्रम्हपुरी परिसरातील उच्च शिक्षणाचे स्वप्न ने. हि. शिक्षण संस्थेने पुर्ण केले. १९६२ ला कला शाखा, १९६३ ला वाणिज्य शाखा, १९७१ ला विज्ञान शाखा, १९७५ ला कनिष्ठ महाविद्यालय आणि व्यावसायिक अभ्यासक्रम, तसेच कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत जवळपास सर्वच विषयात पदव्युत्तर शिक्षणाची सोय केली आहे. महाविद्यालयास विद्यापीठाकडून विविध विषयाचे संशोधन केंद्र म्हणून मान्यता मिळाली असून दरवर्षी बहुसंख्येने विद्यार्थी आचार्य पदवी घेत आहे. सत्र २०२०-२१ या सत्रात महाविद्यालयाला विद्यापीठाने 'आदर्श महाविद्यालय' पुरस्काराने गौरवान्वित केले आहे.

विद्यार्थ्यांच्या कला गुणात, नैतिक मूल्यात वाढ व्हावी म्हणून सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना अहोरात्र कार्यरत आहेत. महाविद्यालयाची गौरवशाली परंपरा पुढे नेत आमचे सजग विद्यार्थी शिक्षण, क्रीडा, प्रशासन, व्यवसाय व समाजकारण आदी क्षेत्रात नावलौकिक मिळवित आहेत, याचा आम्हांस सार्थ अभिमान वाटतो. महाराष्ट्राला लेखन कलेची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. ही परंपरा पुढच्या काळात अधिकाधिक वाढीस लागावी, विद्यार्थ्यांचे चौफेर वाचन व्हावे, समाजातील समस्याचे भान यावे व विद्यार्थ्यांच्या वैचारिक प्रगल्भतेचे दर्शन घडावे हिच निबंधलेखन स्पर्धा आयोजनामागील उद्देश आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील स्पर्धकांना या स्पर्धेत सहभागासाठी पाठवावे, ही अपेक्षा !

## निबंधलेखन स्पर्धेचे नियम व अटी

१) ही स्पर्धा पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी खुली राहील.

२) कोणत्याही महाविद्यालयाला जास्तीत जास्त दोन विद्यार्थी या स्पर्धेसाठी नोंदणी करता येईल. निबंध इमेलवर पाठवितांना महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे प्रवेशपत्र व विद्यार्थ्यांच्या आधारकार्डची फोटोप्रत पाठवावी.

३) स्पर्धेसाठी प्रवेशशुल्क प्रति स्पर्धक रु. १००/- राहील. निबंध लेखन मराठी, हिंदी किंवा इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेतून करता येईल. विद्यार्थ्यांनी सुवाच्य व स्वतःच्या अक्षरात पानाच्या एकाच बाजूने A4 साईज पेपरवर समास सोडून निबंधलेखन करुन इमेलवर PDF स्वरुपात पाठवावा किंवा टाईप केलेला निबंध इमेलवर PDF स्वरुपात पाठवावा.

४) निबंधाच्या पहिल्या पानावर स्पर्धकाचे पूर्ण नांव, महाविद्यालयाचे नांव, वर्ग, पूर्ण पत्ता व Whatsapp नं. लिहून पाठवावा. निबंध १५००-२००० शब्द मर्यादेत असावा.

५) निबंध इमेल व पाठविण्याचा कालावधी २५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२२ असा राहील. व स्पर्धेचा निकाल १० मे २०२२ ला Whatsapp द्वारा जाहीर करण्यात येईल.

६) निकालाबाबत संयोजकांचा निर्णय अंतिम व सर्वांवर बंधनकारक राहील.

७) स्पर्धकांनी आपला निबंध PDF स्वरुपात खालील इमेलवर प्राचार्यांचे स्वाक्षरीचे पत्र, विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन ओळखपत्र किंवा आधारकार्ड फोटो प्रत सहीत वेळेवर पाठवावे.

**Email : cultural.nhc@gmail.com**

८) प्रवेशशुल्क खालील खात्याद्वारे स्वीकारले जाईल.

SBI Branch : Bramhapuri (0338)
A/c. Name : Principal N H College Bramhapuri Examination
Account No. : 37005772923
IFSC Code : SBIN0000338

नोंदणी (Registration Link)
https://forms.gle/bHDyorBFSqUrEWS99



